क्र.प्रतिनि/गट-(अ व ब)/१२८/प्रशा-२/१७५७
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१
दिनांक : १७ डिसेंबर, २०१६

विषय : पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या पर्यटन संचालनालयाच्या आस्थापनेवरील सहसंचालक व उपसंचालक ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत...

संदर्भ : १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, शासन निर्णय क्रमांक:टीडीसी-२०१४/२/प्र.क्र.९६/पर्यटन, दिनांक १४/७/२०१६

२. नियोजन विभाग, पत्र क्र.इएसटी-१०१६/प्र.क्र.१९६/का.१४२७ , दि.२८/११/२०१६

परिपत्रक

नियोजन विभागाच्या संदर्भ क्रमांक २ समोरील पत्रान्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत स्थापित पर्यटन संचालनालयाच्या आस्थापनेवर संदर्भ क्रमांक १ समोरील शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेल्या सहसंचालक-१ पद, उपसंचालक-३ पदे व सहायक संचालक-२ पदे या पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्यास इच्छुक अधिका-यांची नावे कळविणेबाबत कळविले आहे. तसेच सदर पदांवरील प्रतिनियुक्तीचा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी इ.) नियम १९८२ मधील नियमांनुसार असेल व सेवानिवृत्तीस किमान ५ वर्षे शिल्लक असलेल्या पात्र अधिका-यांची नावे कळविणेबाबत कळविले आहे.

२/- तरी संचालनालयाच्या सहसंचालक, उपसंचालक व गट-ब (राजपत्रित) संवर्गावरील सर्व अधिका-यांना विचारणा करण्यात येते की, ते पर्यटन संचालनालयाच्या सदरील प्रतिनियुक्तीच्या पदावर जाण्यास इच्छुक आहेत किंवा कसे याबाबत संचालनालयास हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत कळवावे.

(संजय काळे)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुंबई.

प्रति,
श्री/श्रीमती -----------------------------
--------------------------------------
--------------------------------------

प्रत: कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का.१४२७), मंत्रालय, मुंबई यांना त्यांचे संदर्भ क्रमांक १ समोरील पत्रास अनुसरुन माहितीस्तव अग्रेषित.